सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
Maharashtra Water Resources Regulatory Authority

## आदेश क्रमांक १ / २०१८

### महाराष्ट्र राज्यात घरगुती, औद्योगिक व कृषी - सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा

संदर्भ :- १) घरगुती व औद्योगिक पाणी वापराच्या प्रयोजनार्थ प्राधिकरणाने सप्टेंबर २०१७ मध्ये निर्गमित केलेले निकष (www.mwrra.org)

२) ठोक जल प्रशुल्क प्रस्तावाबाबत प्रधान सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग यांचेबरोबर दि. ३० मे २०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

दि. ११ जानेवारी २०१८

१.० प्रस्तावना

१.१ महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे विनियमन करण्याकरिता, तसेच जलसंपत्तीचे कुशल समन्याय व टिकाऊ व्यवस्थापन, वाटप व वापर सुकर करण्याकरिता व पाण्याचे दर निश्चित करण्याकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (यापुढे "अधिनियम" असे संबोधले आहे) पारित करण्यात आला. अधिनियमआतील कलम ३(१) अन्वये अधिनियमातील तरतुदीच्या प्रयोजनार्थ दि. ४ मे २००५ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (यापुढे "प्राधिकरण" असे संबोधले आहे) गठित करण्यात आले.

अधिनियमातील कलम ११(घ) अन्वये सिंचन व्यवस्थापनाचा प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाण्याची दर (जलप्रशुल्क) निर्धारणाची पद्धत ठरविण्याचे आणि पाणीपट्टीचे निकष ठरविण्याचे अधिकार प्राधिकरणास प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच अधिनियमातील कलम ११(प) अन्वये प्राधिकरणास दर तीन वर्षांनी पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरीक्षण करण्याचे अधिकार आहेत.

१.२ यापूर्वी प्राधिकरणाने दि. ३० मे २०११ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील घरगुती, औद्योगिक व कृषी क्षेत्रातील पाणी वापरासाठीचे ठोक जलदर निश्चित केलेले होते. हे दर रब्बी हंगाम

M. W. R. R. A. MUMBAI



9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.
Tel.:(O)+91-22-2215 2019, Email: mwrra@mwrra.in I mwrralibrary@yahoo.co.in I Website : www.mwrra.org

२०१०-११ पासून म्हणजेच १५ ऑक्टोबर २०१० पासून लागू करण्यात आले होते. यानंतर पाणीपट्टी दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. दरम्यानच्या काळात महागाई निर्देशांकामध्ये ६३% वाढ झालेली आहे.

१.३ सद्या सिंचन व्यवस्थापनाचा खर्च पाणीपट्टी वसुलीपेक्षा जास्त होत आहे. तसेच प्रकल्पाच्या देखभाल-दुरुस्तीस पुरेसा निधीही उपलब्ध होत नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या देखभालीवर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाने दि. १८ मार्च २०१७ च्या पत्रान्वये ठोक जल प्रशुल्क ठरविण्याचा प्रस्ताव दिला आहे. सदर प्रस्तावानुसार सन जुलै २०१६ ते जून २०१९ साठीचा राज्यातील सिंचन व्यवस्थापनाचा प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाचा सरासरी अंदाजित खर्च रू. १४१२.१२ कोटी आहे. सन २०१७-१८ साठी हा खर्च रू. १४०६.५३ कोटी इतका आहे. शासनाने सदर प्रस्तावात दिलेली सन २०१४-१५ ची निर्मित सिंचन क्षमता व त्यापैकी प्रत्यक्ष वापरातील सिंचन क्षमतेची आकडेवारी विचारात घेऊन प्राधिकरणाने रू. ९११.४४ कोटी इतका अंदाजित खर्च ठोक जल प्रशुल्क प्रारूप प्रस्ताव तयार करण्यासाठी विचारात घेतला होता. सदर अंदाजित खर्चाची विभागणी जून २०१४ मध्ये प्राधिकरणाने विविध उपभोकत्यांची मते विचारात घेऊन निश्चित केलेल्या निकषाद्वारे घरगुती (२२%),औद्योगीक (५९%) व कृषी (१९%) पाणीवापर कर्त्या संवर्गावर विभागून त्याआधारे प्रारूप जल प्रशुल्काचा प्रारूप प्रस्ताव तयार केलेला होता.

१.४ प्राधिकरणाने तयार केलेला प्रारूप जलप्रशुल्क प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत वृत्तपत्र, संकेतस्थळ यावरून व जलसंपदा विभागाच्या स्थानिक कार्यालयात जनतेस उपलब्ध करून देण्यात आला होता. एक महिन्याची मुदत (१ ते ३१ ऑगस्ट, २०१७) देऊन जनतेकडून अभिप्राय व सूचना मागविण्यात आल्या होत्या. शासनाचे संबंधित विभाग, क्षेत्रीय अधिकारी, जलक्षेत्रातील विविध तज्ञ, अशासकीय संस्था, पाणी वापर संस्था, अन्य उपभोक्ते यांचेकडून प्रारूप प्रस्तावावरील प्राप्त सूचना व अभिप्राय विचारात घेऊन प्राधिकरणाने ठोक जलप्रशुल्क प्रस्ताव अंतिम केलेला आहे.

१.५ प्रारूप प्रस्तावावरील प्राप्त सूचना / अभिप्राय व त्यावरील प्राधिकरणाचा प्रतिसाद याबाबतचा अहवाल प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसृत करण्यात आलेला आहे. प्राप्त सुचना व अभिप्रायाद्वारे प्रस्ताव अंतीम करतांना प्राधिकरणास जून २०१६ पर्यंतची सिंचन क्षमता व सन २०१६-१७ मधील प्रत्यक्ष सिंचनाचे क्षेत्र याबाबतचा तपशील विचारात घेऊन सन २०१७-१८ साठीचा अंदाजित खर्च रू. १०१६.१४५ कोटी अंतिम केलेला आहे. जून २०१४ मधील निकषानुसार या खर्चाची विविध प्रवर्गानुसार विभागणी केलेली आहे. तसेच पारूप प्रस्तावावरील प्राप्त सूचना व अभिप्रायांचा विचार केलेला आहे.

M. W. R. R. A. MUMBAI

१.६ सिंचनामधील होणारा अनियमित पाणीवापर व पाणीनाश नियमित करण्यासाठी जलसंपदा विभागाने दि. १८ मार्च २०१७ च्या प्रस्तावात सिंचनासाठीचा संपूर्ण पाणी पुरवठा व पाणीपट्टी आकारणी घनमापन पद्धतीने प्रस्तावित केलेली आहे. तसेच चौदाव्या वित्त आयोगाने देखील हीच शिफारस केली आहे. पाणी वापराच्या हक्कांचे समन्यायी तत्वांवर वितरण निर्धारित करणे, प्रत्यक्ष वितरण करणे, संनियंत्रण करणे इत्यादी अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी घनमापन पद्धतीनुसार करणे सुलभ होणार आहे. याद्दष्टीने घनमापन पद्धतीचा स्वीकार करणे आवश्यक ठरते. या बाबतच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सिद्धता विभागाकडून सुरू झाली असल्याचे प्रधान सचिव (लाक्षेवि) जलसंपदा विभाग यांनी संदर्भ २ मधील बैठकीत प्राधिकरणाचे निदर्शनास आणले आहे. तसेच क्षेत्राधारित दराचे प्रयोजन उरले नाही असे स्पष्ट केले आहे.

## प्राधिकरणाचे आदेश

२.० अधिनियमातील कलम ११(घ) व ११(प) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्रातील कृषी - सिंचन, घरगुती व औद्योगिक प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठीचे ठोक जल प्रशुल्क (पाणीपट्टी) चे सुधारित दर सोबतच्या अनुक्रमे परिशिष्ट क्र. १, २ व ३ अन्वये निश्चित करीत आहे.

२.१) प्रवाही सिंचनाचे दर परिशिष्ट क्र. १ मधील तक्ता क्र. १ नुसार राहतील.

२.२) खाजगी उपसा सिंचन योजनांचे दर परिशिष्ट क्र. १ मधील तक्ता क्र. २ नुसार राहतील.

२.३) शासकीय उपसा सिंचन योजनांचे दर परिशिष्ट क्र.१ मधील परिच्छेद ५ नुसार राहतील.

२.४) घरगुती वापरासाठीचे मानक दर परिशिष्ट क्र. २ मधील तक्ता क्र. १ नुसार व पाणी वापराचे परिमाणानुसार आकारणीचे दर परिशिष्ट क्र.२ मधील तक्ता क्र. २ नुसार राहतील.

२.५) औद्योगिक वापरासाठीचे मानक दर परिशिष्ट क्र. ३ नुसार मधील तक्ता क्र. १ नुसार व पाणी वापराचे परिमाणानुसार आकारणीचे दर परिशिष्ट क्र.३ मधील तक्ता क्र. २ नुसार राहतील.

३.० बिगर सिंचन प्रयोजनार्थ पाणी वापराच्या हिशोबासाठीचे जलवर्ष १ जुलै ते ३० जून असे विचारात घ्यावे.

M.W.R.R.A. MUMBAI

४.० उपलब्ध पाण्याचा इष्टतम वापर व्हावा, आरक्षित पाणी विना वापर राहू नये यासाठी बिगरसिंचन वापरकर्त्यास टप्पा नियोजनाची मुभा देण्यात येत आहे. बिगर सिंचन पाणी वापर कर्ता त्यांना मंजूर पाणी वापराचा विनियोग टप्प्या टप्प्यात करणार असल्यास याबाबतचे नियोजन त्यांनी जलसंपदा विभागास कराकरणे पूर्वी देण्यात यावे. अश्या पाणी वापराचा टप्पा नियोजनाची तरतुद करारात करण्यात यावी. पाणीपट्टीची आकारणी या टप्पा नियोजनामधील पाणी वापरानुसार करण्यात यावी. मात्र उर्वरित पाण्याच्या परिमाणावर (एकूण मंजूर पाणी - टप्पा नियोजनातील पाणी) ५% दराने हमीशुल्काची आकारणी करावी. तसेच प्रत्यक्ष पाणी वापर व टप्पा नियोजनातील पाणी वापर यात १०% पेक्षा जास्त विचलन असल्यास पुढील प्रमाणे आकारणी करावी.

प्रत्यक्ष पाणी वापर टप्पा नियोजनातील पाणी वापराच्या परिमाणाच्या ९०% पेक्षा कमी असल्यास टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% इतक्या परिमाणावर आकारणी करावी. प्रत्यक्ष वापर हा टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ९०% ते ११०% या मर्यादेत असल्यास मानक दराने आकारणी करावी. मात्र प्रत्यक्ष वापर टप्पा नियोजनातील परिमाणाच्या ११०% पेक्षा जास्त असल्यास अशा जास्तीच्या परिमाणावर मानक दराच्या १.५० पट दराने आकारणी करावी. अधिक स्पष्टतेसाठी परिशिष्ट - ४ मध्ये नमुना आकडेमोड उदाहरणादाखल दिली आहे.

५.० बिगर सिंचनासाठीच्या पाणीपट्टीचे सुधारित दर १ फेब्रुवारी २०१८ पासून लागू होतील. सिंचनासाठीच्या पाणीपट्टीचे दर परिशिष्ट १ परिच्छेद ६ मध्ये नमूद उन्हाळी हंगाम २०१८ सुरू होण्याच्या दिनांकापासून लागू होतील.

६.० परिशिष्ट क्र. १, २ व ३ मधील दर हे स्थानिक उपकराव्यतिरिक्त आहेत. शासनाकडून वेळोवळी निश्चित केल्यानुसार स्थानिक उपकर स्वतंत्ररित्या देय राहतील.

७.० १ जुलै २०१८ ते ३० जून २०१९ या जलवर्षासाठी परिशिष्टातील दर हे १०% वाढीसह अनुज्ञेय राहतील.

८.० १ जुलै २०१९ ते ३० जून २०२० या जलवर्षासाठी परिशिष्टातील दर हे २०% वाढीसह अनुज्ञेय राहतील.

९.० जलसंपदा विभागाने प्राधिकरणास पाठविलेल्या दि. १८ मार्च २०१७ च्या प्रस्तावात प्रवाही सिंचनामध्ये होणारा अनियंत्रित पाणी वापर व पाणी नाश नियंत्रित करण्यासाठी यापुढे सिंचनासाठीचा संपूर्ण पाणी पुरवठा व पाणीपट्टी आकारणी घनमापन पद्धतीने करणे प्रस्तावित केले आहे. संक्रमण कालावधीत पाणी मोजमाप यंत्रे बसवेपर्यंत प्रकल्प / कालवा

M.W.R.R.A. MUMBAI

/ शाखेवरील पडलेली ड्युटी (हेक्टर/घमी) व क्षेत्रानुसार घनमापन पध्दतीने आकारणी करता येईल. ड्युटीबाबत कार्यकारी अभियंता यांचा निर्णय अंतिम राहील.

१०.० राज्य शासनाने नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया-पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण नगर विकास विभागाच्या दि. ३० नोव्हेंबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार जाहीर केलेले आहे. या धोरणातील तरतुदीनुसार प्रक्रियायुक्त पाण्याच्या पुनर्वापराची दरनिश्चिती करण्याचे अधिकार उक्त धोरणातील परिच्छेद १२ मध्ये नमूद केलेली समिती / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांना आहेत. सदर धोरणामुळे खालील बाजूच्या जलस्रोताच्या गुणवत्तेत होणारी वाढ तसेच सांडपाण्याच्या पुनर्वापरामुळे नैसर्गिक पाण्यावरील ताण कमी होण्यास मदत होत असल्याने अधिनियमातील कलम १२(५) मधील तरतुदीनुसार प्राधिकरण जाणीवपूर्वक सदर धोरणास पाठिंबा (Support) देत आहे. मात्र हे धोरण राबवतांना खालील तरतुदीचे अनुपालन होणे गरजेचे आहे.

अ) संदर्भ १ मधील परिच्छेद ६.२ (iii) मधील तरतुद.

आ) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रक्रिया केलेले सांडपाण्याचे वहन प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त नलिकेद्वारे करण्यात यावे.

इ) प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सिंचन प्रयोजनार्थ पुनर्वापरासाठीचा दर प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय दराच्या ६०% पेक्षा अधिक असणार नाही.

ई) प्रक्रिया केलेले सांडपाणी कालव्यात / नैसर्गिक नदी नाल्यामध्ये आल्यास अश्या पाण्याचे विनियमन महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ११(१) नुसार करण्यात यावे. अशा पाण्याच्या वापरासाठीचे दर नैसर्गिक पाण्यानुसारच राहतील.

११.० या पुढील बिगर सिंचन पाणी पुरवठ्याचे करार मजनिप्रा ने दि. २२ सप्टेंबर २०१७ रोजी निर्गमित केलेल्या "Criteria for Distribution of Surface Water Entitlements by River Basin Agencies for Domestic & Industrial Uses" मधील तरतुदींशी सुसंगत असणे अनिवार्य आहे.

१२.० दरवर्षी ३० सप्टेंबर पर्यंत सर्व सिंचन महामंडळांनी पाणी वापर प्रवर्ग निहाय ३० जून रोजी संपलेल्या सिंचन वर्षातील जमा झालेली पाणीपट्टी, सिंचन प्रकल्पाच्या देखभाल-दुरूस्तीवर केलेला खर्च, शासकीय उपसा सिंचन योजनांच्या वीज बीलावरील खर्च, शासकीय उपसा सिंचन योजनांवरील देखभाल-दुरूस्ती खर्च, घरगुती व औद्योगिक वापरावरील सुटी / सवलती यामुळे महसुलात झालेली घट व दंडनीय तरतुदीमुळे महसुलात झालेली वाढ याबाबतचा तपशील प्राधिकरणास पुढील धोरणात्मक

M.W.R.R.A. MUMBAI

आखणीसाठी उपलब्ध करून द्यावा. तसेच सदर तपशील उपभोक्त्यांचे अवलोकनार्थ संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावा.

१३.० सिंचन महामंडळांनी आस्थापनावरील खर्चावर नियंत्रण ठेवावे. सिंचन क्षेत्रातील पाणी वापराची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने पाणीपट्टीतून मिळणाऱ्या महसूलापैकी किमान ४०% महसूल देखभाल-दुरूस्ती व उपसा सिंचन योजनांच्या वीज देयकावार खर्च करावा.

१४.० सदर पाणीपट्टीचे दर जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध करण्याची कार्यवाही स्थानिक क्षेत्रीय अधिकाऱ्यांना करण्याबाबत शासनस्तरावरून आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१५.० **अडचणी दूर करण्याचे अधिकार :** सदर दर प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास संबंधित ठोक पाणी वापरकर्ता / संबंधित सिंचन महामंडळ / शासन याचिकाद्वारे प्राधिकरणाकडे अर्ज करू शकतील. याबाबतचा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

सहपत्र - परिशिष्ट क्र. १ ते ४

| ( शि. त्रि. सांगळे ) | ( वि. ज. तिवारी ) 11-1-2018 | ( वि. मा. कुलकर्णी ) |
|---|---|---|
| सदस्य (अर्थव्यवस्था) | सदस्य (विधी) | सदस्य (जसं-अभियांत्रिकी) |

11/1/18
( के. पी. बक्षी )
अध्यक्ष

M. W. R. R. A. MUMBAI

# परिशिष्ट क्र. १

## सिंचनासाठी ठोक जल प्रशुल्क

### १) प्रवाही सिंचनाकरिता पाण्याचे घनमापन दर

तक्ता क्र. १

| अ. क्र. | हंगाम | नोंदणीकृत पाणी वापर संस्था (पैसे प्रति घमी) | वैयक्तिक लाभधारकांकरिता (पैसे प्रति घमी) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | खरीप | ३.३८ | ४.५० |
| २ | रबी | ६.७५ | ९.०० |
| ३ | उन्हाळी | १०.१३ | १३.५० |

### २) प्रवाही सिंचनाच्या अनुषांगिक तरतुदी :

२.१) सहकारी अधिनियम १९६० तसेच म.सिं.प.शे.व्य. अधिनियम २००५ अंतर्गत नोंदणी झालेल्या सर्व पाणी वापर संस्थांना तक्ता क्र. १, स्तंभ क्र. ३ मधील दर अनुज्ञेय राहतील.

२.२) कालव्यातून जलग्रहण बिंदू (intake point) ला घनमापन पध्दतीने मोजून पाणी घेऊन शेतकऱ्यांना सिंचनासाठी विहिरीत / शेततळयात साठविता येईल किंवा प्रवाही पध्दतीने थेट सिंचनासाठी वापरता येईल. पाणी साठवून ठेवावयाचे असलयास विहिर / शेततळयात गेजपट्टी बसवावी.

२.३) सुक्ष्म सिंचनासाठी शेतात पाणी साठविण्यासाठी कालव्यापासून विहीर / शेततळयापर्यंत पाईपलाईन शेतकऱ्यांनी स्वखर्चाने टाकावी. उघड्या पाटाद्वारे विहिरी / शेततळयात पाणी भरून घेतल्यास १०% पाणी व्यय आकारला जाईल.

### ३) खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी पाण्याचे घनमापन दर

तक्ता क्र. २

| अ. क्र. | वर्गवारी | पाणीपुरवठा स्रोत | प्रस्तावित दर (पैसे प्रति घमी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | खरीप | रबी | उन्हाळी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | मोठ्या प्रकल्पांचे जलाशय | ३.६६ | ७.३१ | १०.९७ |
| २ | | मध्यम प्रकल्पांचे जलाशय, मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे कालवे, साठवण तलाव | २.९३ | ५.८५ | ८.७८ |

| अ. क्र. | वर्गवारी | पाणीपुरवठा स्रोत | प्रस्तावित दर ( पैसे प्रति घमी ) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | खरीप | रबी | उन्हाळी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ३ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालच्या बाजूचा नदीचा नियंत्रित भाग / उर्ध्व भागातील जलाशयाचा आधार असलेले को. प. बंधारे / जलविद्युत केंद्राचे अवजल | २.९३ | ५.८५ | ८.७८ |
| ४ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | लघु प्रकल्पांचे कालवे, जलशयाचा आधार नसलेले को. प. बंधारे व कोणताही बंधारा नसलेली अनियंत्रित व्यवस्था. | १.४६ | २.९३ | ४.३९ |
| ५ | पाणी वापरकर्त्या संस्थेने किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | पाणी वापरकर्त्या संस्थेने किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असलेले धरण / बंधारा | ०.४७ | ०.९४ | १.४० |

**४) खाजगी उपसा सिंचन योजनांबाबतच्या अनुषांगिक तरतुदी :**

४.१) उपरोक्त दर हे वैयक्तिक लाभार्थींच्या उपसा सिंचन योजनांसाठी परिगणित केलेले आहेत.

४.२) मीटरद्वारे मोजून पाणी घेणाऱ्या सहकारी अधिनियम १९६० तसेच म.सिं.प.शे.व्य. अधिनियम २००५ नोंदणीकृत उपसा पाणी वापर संस्थांना उपरोक्त दरात २५% सवलत अनुज्ञेय राहील.

४.३) खाजगी उपसा सिंचन योजनांच्या बाबत लाभार्थींनी स्वखर्चाने डिलीव्हरी पाईपलाईनवर मीटर बसवावेत. संक्रमण कालावधीत मीटर बसवेपर्यंत खाजगी वैयक्तिक उपसा सिंचन धारकांची आकारणी पंपाचा विसर्गाच्या आधारे किंवा प्रमाणित ड्युटीद्वारे करावी. मात्र ही सवलत या आदेशाच्या दिनांकापासून केवळ १ वर्षासाठी अनुज्ञेय राहील. यानंतर प्रवाही सिंचनासाठी विहीत केलेल्या दराच्या १.५० पट दराने आकारणी करावी.

४.४) खाजगी नोंदणीकृत उपसा पाणी वापर संस्थांबाबत मीटर न बसवल्यास / बंद पडल्यास / मीटर मध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आल्यास प्रत्यक्ष सिंचन क्षेत्र व प्रमाणित ड्युटीवर आधारित पाण्याचे परिमाण परिगणित करून प्रवाही पाणीपट्टीच्या २.० पट दराने आकारणी करावी.

M. W. R. R. A. MUMBAI

५) शासकीय उपसा सिंचन योजनांसाठी पाण्याचे दर

शासकीय उपसा सिंचन योजनांसाठी पाणीपट्टीचे दर प्रकल्पनिहाय व हंगामनिहाय निश्चित करावेत. सदर दर निश्चित करतांना प्रकल्पाचे मुख्य अभियंता यांनी उपरोक्त १ (अ) नुसार "प्रवाही सिंचनाकरिता पाण्याचे घनमापन दर" अधिक उपसा सिंचन योजनेवरील खर्चाच्या (वीजखर्च, उपसा सिंचन योजनेच्या शीर्षकामाच्या देखभाल-दुरूस्ती व परिचालन) १९% खर्च विचारात घ्यावा.

६) सिंचन हंगाम कालावधी

जल प्रशुल्क आकारणीकरीता कोकण, विदर्भ व उर्वरित राज्यासाठी खरीप, रबी व उन्हाळी हंगामाचा कालावधी खालीलप्रमाणे राहील;

| हंगाम | कालवधी (कोकण व विदर्भ व्यतिरिक्त) | कालवधी (कोकण व विदर्भ करीता) |
|---|---|---|
| खरीप | १ जुलै ते १४ ऑक्टोबर | १ जुलै ते १४ नोव्हेंबर |
| रबी | १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी | १५ नोव्हेंबर ते ३१ मार्च |
| उन्हाळी | १ मार्च ते ३० जून | १ एप्रिल ते ३० जून |

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY DOMESTIC MWRRA INDUSTRY AGRICULTURE

७) इतर तरतुदी

७.१) दि. २/५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार जलसपंदा विभागाने विकेंद्रीत पाणीसाठयापर्यत पाणी उपलब्ध करुन दिल्यास, यासाठी शासन वहन व्यवस्थेच्या अनुरुप (१ अ / १क) मध्ये नमूद पाणीपट्टीचे दर लागू होतील. लाभार्थीने कालव्यातून विकेंद्रित साठ्यापर्यंत पाईपलाईन द्वारे मोजून पाणी घेतल्यास वहन व्यय विचारात घेऊ नये. मात्र नैसर्गिक नाल्याद्वारे विकेंद्रित साठे भरून घेतल्यास १०% वहन व्यय विचारात घ्यावा.

७.२) मत्स्यशेतीकरिता सिंचनासाठीचे घनमापन दर अनुज्ञेय राहतील.

सवलती / प्रोत्साहने / दंडनीय तरतुदी

८) सवलतीच्या तरतुदी

८.१) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना लाभक्षेत्रात दिलेल्या पर्यायी जमिनीच्या प्रवाही सिंचनासाठी ७५% दर आकारणी करावी. मात्र प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वखर्चाने उपसा सिंचन राबवल्यास ५०% दराने आकारणी करावी.

८.२) जर खरीप पिकासाठी तो हंगाम लांबल्यामुळे रबीमध्ये पाणी घेतले अथवा रबी पिकासाठी उन्हाळी हंगामात पाणी घेतले तर लांबलेल्या सिंचनाच्या आवर्तनासाठी तत्सम खरीप / रबी दराने आकारणी करावी.

M.W.R.R.A. MUMBAI

९) प्रोत्साहनात्मक तरतुदी:

९.१) प्रकल्पावरील प्रथम वर्षाच्या सिंचनासाठी (चाचणी सिंचन) पाणीपट्टी आकारणी करू नये.

९.२) मीटरद्वारे घनमापन पद्धतीने मोजून पाणी घेऊन सिंचनाच्या आधुनिक पध्दतीचा (सूक्ष्म सिंचन ) अवलंब केला असेल तर अनुज्ञेय दराच्या ७५ % दराने आकारणी करावी. (नोंदणीकृत पाणी वापर संस्थांनी घनमापन पद्धतीने पाणी मोजून घेऊन सुक्ष्म सिंचन केल्यास नोंदणीकृत पाणी वापर संस्थेसाठी प्रवाही सिंचनासाठी अनुज्ञेय केलेल्या दराच्या ७५% दराने आकारणी करावी.)

९.३) हंगाम सुरु होण्यापूर्वी पाणीपट्टीची पूर्ण आगाऊ अदायगी केली असेल तर अनुज्ञेय दराच्या ९० % दराने आकारणी करावी.

९.४) जुन्या माजी मालगुजारी तलावांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार अनुज्ञेय ठरविलेले पाणी वापराचे हक्क अबाधित राहतील.

१०) दंडनीय तरतुदी :

१०.१) अनुज्ञेय कालावधी नंतर विलंबाने केलेल्या अदायगी करिता आकारणी केलेल्या पाणीपट्टीवर अथवा त्यांच्या हिश्यावर द.सा.द.शे. १०% दराने विलंबशुल्क आकारण्यात यावे.

१०.२) सिंचनासाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा अनधिकृतपणे औद्योगीक प्रयोजनार्थ वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास अनुज्ञेय औद्योगीक दराच्या दुप्पट दराने आकारणी करावी.

## परिशिष्ट क्र. २

### घरगुती पाणी वापरासाठीचे ठोक जल प्रशुल्क

१) घरगुती पाणीवापरासाठीचे मानक दर

तक्ता क्र. १

| अ. क्र. | वर्गवारी | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | घरगुती पाणी वापराचे मानक दर (रू प्रति घमी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्राम पंचायत | नागरी स्थानिक संस्था | महानगर पालिका |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | जलाशयातून होणारा पाणी पुरवठा | ०.१५ | ०.१८ | ०.२५ |
| २ | वहन व्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालील बाजूची नदी, कालवे व को.प.बंधारे (*) | ०.३० | ०.३६ | ०.५० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | उर्ध्व बाजूच्या कोणतेही जलाशय / कालवा इ. स्त्रोतातून पाणी न सोडता केवळ नदीच्या नैसर्गिक प्रवाहातून होणारा पाणी वापर. | ०.०८ | ०.०९ | ०.१३ |
| ४ | किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका बंधारा स्वखर्चाने बांधलेला व त्याचे स्वखर्चाने व्यवस्थापन होत असल्यास | संस्थेच्या मालकी हक्काच्या जलाशयातून किंवा जलाशय निर्मितीचा पाणी वापराच्या प्रमाणशीर खर्चात संस्थेचा सहभाग असल्यास अशा जलाशयातून होणारा पाणी पुरवठा | ०.०२ | ०.०३ | ०.०४ |

* ज्या पाणी पुरवठा स्त्रोताची साठवण क्षमता यातून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या ८०% पेक्षा कमी असते व ज्यांना वरील बाजूच्या पाणी स्त्रोतावर (धरण, विद्युतगृहाचे अवजल इ.) अवलंबून रहावे लागते (Backup) असे स्त्रोत.

**टिप** – ज्या प्रकरणी संस्थेने स्वखर्चाने धरण बांधले आहे किंवा धरणाच्या पाणी वापराच्या प्रमाणात खर्च दिला आहे तथापि जलसंपदा विभाग धरणाची देखभाल-दुरूस्ती जलसंपदा विभागाच्या निधीतून करत आहे, अशा प्रकरणी तक्ता १ अ.क्र. ४ मधील दरात २०% वाढ अनुज्ञेय राहील.

M.W.R.R.A. MUMBAI

२) **पाणी वापराच्या मर्यादा:**

प्राधिकरणाने ठोक पाणी वापर हक्काचे वितरण करण्यासाठीचे (Bulk Water Entitlement) निकष आदेशातील संदर्भ १ नुसार दि. २२ सप्टेंबर २०१७ रोजी निश्चित केलेले आहेत. यानुसार अनुज्ञेय पाणी वापराच्या पुरवठ्याच्या मर्यादा पुढील प्रमाणे आहेत. तसेच अनुज्ञेय पाण्याचा हिशोब जल वर्षासाठी (१ जुलै ते ३० जून) ठेवण्यात यावा.

१. ग्रामपंचायत — ५५ एलपीसीडी
२. पेरीअर्बन — ७० एलपीसीडी
३. क वर्ग नगरपालिका / नगरपंचायत — ७० एलपीसीडी
४. ब बर्ग नगरपालिका — १०० एलपीसीडी
५. अ वर्ग नगरपालिका — १२५ एलपीसीडी
६. महानगरपालिका (लोकसंख्या ५० लाखापेक्षा कमी) — १३५ एलपीसीडी
७. महानगरपालिका (लोकसंख्या ५० लाख किंवा त्यापेक्षा जास्त) — १५० एलपीसीडी

३) **पाणी वापरानुसार पाणीपट्टी आकारणीचे दर :**

ग्रामपंचायत / नगरपालिका / नगरपंचायत / महानगरपालिकेसाठी घरगुती पाणी पुरवठ्यासाठीचे ठोक जल प्रशुल्क पुढील प्रमाणे राहील.

तक्ता क्र. २

| अ. क्र. | प्रत्यक्ष पाणी वापर [गळती, अनधिकृत वापर (UFW) व व्यवसायिक वापरासह] | आकारणीचा दर |
|---|---|---|
| अ | अनुज्ञेय पाणी वापराच्या ११५ % पर्यंतच्या परिमाणावर | मानक दर |
| ब | अनुज्ञेय पाणी वापराच्या ११५ % ते १४० % पर्यंतच्या पाणी वापरावर | मानक दराच्या १.५० पट दराने |
| क | अनुज्ञेय पाणी वापराच्या १४० % मर्यादेवरील पाणी वापरावर | मानक दराच्या २.०० पट दराने |

प्राधिकरणाचे कलम ११(घ) मधील तरतुदी विचारात घेऊन पाण्याचा दक्षतेने वापर करण्यास व पाणी बचतीसाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशाने व पाण्याच्या अपव्ययास आळा घालण्यासाठी अनुज्ञेय पाणी वापर मर्यादेबाहेरील पाणी वापरासाठी जादा दराने आकारणी आदेशीत केलेली आहे.

मात्र ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी / निमशासकीय संस्थांनी स्वखर्चाने जलाशये निर्माण केलेली आहेत व त्याची देखभाल-दुरुस्ती सुद्धा स्वखर्चाने केली जाते अशा जलाशयातून वापरलेल्या संपूर्ण पाण्याची आकारणी मानक दरानेच करावी.

M. W. R. R. A. MUMBAI

तथापी जादा दराने पाणीपट्टी भरून जादा पाणीवापरावर हक्क सांगता येणार नाही. नागरी स्वराज्य संस्थांनी गळती प्रतिबंधन, अनधिकृत पाणी वापर रोखणे, पाणी-बचत प्रचार, पुनर्वापर, रेनवॉटर हार्वेस्टिंग इ. उपाय योजनांवर भर देऊन पाणी वापर विहीत मर्यादेत ठेवावा.

४) खाजगी अथवा बिनसरकारी संस्थेच्या नागरी वस्त्यांसाठी (Township) महानगर पालिकांसाठी निर्धारित केलेल्या दरांच्या ५ पट दर अनुज्ञेय राहतील.

५) अनुषांगिक तरतुदी :

५.१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ठोक पाणी हक्क वितरणाचे निकष दि. २२ सप्टेंबर २०१७ रोजी जहिर केले आहेत, त्यातील कलम ६.२ (५) मध्ये नगरपालिका / महानगरपालिका यांना वार्षिक पाण्याचे अंदाजपत्रक देणे बंधनकारक केले आहे. यातील आकडेवारीनुसार अनुज्ञेय पाणी परिगणित करून आकारणी करण्यात यावी. एखादी नगरपालिका / महानगरपालिका एकापेक्षा जास्त स्त्रोतामधून पाणी घेऊन (उदा. जलसंपदा विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) त्याचे एकत्रित वितरण नागरी स्वराज्य संस्थेस करत असल्यास त्याबाबतचा सर्व तपशील नागरी स्वराज्य संस्थेने पाणी अंदाजपत्रकात देणे अनिवार्य राहील. अशा प्रकरणी अनुज्ञेय दंडाची रक्कम स्त्रोत निहाय पाणी पुरवठ्याच्या प्रमाणात आकारावी.

५.२) हे ठोक जलदर आदेश निर्गमित झाल्यापासून २ वर्षाच्या आत आयुक्त महानगरपालिका / मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपालिका / नगरपंचायत हे आवश्यक क्षमतेची व विहित प्रमाणकांपर्यत गुणवत्ता येण्याच्या दृष्टीने सांडपाणी / दूषित जल यावर प्रक्रिया करण्यासाठी नवीन/ अतिरिक्त सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (STPs) उभारण्याचा कृती कार्यक्रम आखून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांना सादर करतील. हे न केल्यास त्यानंतर परिच्छेद ३ मधील दराच्या दीडपट दराने आकारणी करण्यात यावी. महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळामार्फत घरगुती पाणी वापर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना दंडनीय दर लागु झाल्यास महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाने या दंडनीय दराने स्थानिक स्वराज्य संस्थाना आकारणी करावी व दंडनीय आकारणीची रक्कम जलसंपदा विभागाकडे वर्ग करावी.

५.३) व्यापारी संस्था /खाजगी वसाहती / नागरी वसाहती (townships) साठी बांधकाम चालू असे पर्यंत वापरलेल्या पाण्याकरिता औद्योगिक (प्रक्रिया) दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी व बांधकाम पूर्ण झाल्यावर (वापर परवाना मिळालेनंतर) होणाऱ्या पाणीवापरासाठी परिच्छेद ४ नुसार पाणीपट्टी आकारणी करावी. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे मीटर बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी.

५.४) पेयजल पुरवठयाच्या प्रयोजनार्थ अवर्षण कालावधीत जलाशयातून करण्यात आलेल्या आरक्षणासाठी (प्रत्यक्ष वापर कमी असला तरी) बाष्पीभवन व वहनव्ययासह एकूण परिमाणास मानकदराने पूर्ण आकारणी करण्यात यावी.

M.W.R.R.A. MUMBAI

सवलती / प्रोत्साहने / दंडनीय तरतुदी :

६) सवलतीच्या तरतुदी

६.१) पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत हा कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील व कालव्याच्या कोणत्याही बाजूस त्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटर च्या आत असलेली विहिर असल्यास अशा पाणी पुरवठ्याचा दर हा तक्ता १.० अ. क्र. १ मधील मानक दराच्या ५०% राहील.

७) दंडनीय तरतुदी

७.१) करारनामा न करता पाणी वापरल्यास परिच्छेद २.२ मधील नमूद दराच्या २.० पट (१००% दंडनीय आकारणी) दराने आकारणी करावी.

७.२) स्थानिक स्वराज्य संस्था पिण्याच्या पाण्याचे पाणीहक्कातून जलसंपदा विभागाची मान्यत न घेता औद्योगिक ग्राहकास / जलक्रिडा केंद्रास पाणी पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा पाणी वापरासाठी अनुज्ञेय औद्योगिक दराच्या ३.० पट दराने पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करावी.

७.३) मीटर नसल्यास वा बंद आढळलेस मंजूर परिमाण किंवा लगतच्या कालावधीतील वापर यापैकी जे जास्त असेल त्या परिमाणावर अनुज्ञेय दराच्या १.५० पट दराने आकारणी करावी.

७.४) थकित पाणीपट्टीवर द.सा.द.शे. १०% दराने दंड आकारणी करावी.

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY
MWRRA
DOMESTIC • AGRICULTURE • INDUSTRY

M. W. R. R. A.
MUMBAI

<u>परिशिष्ट क्र. ३</u>

## औद्योगिक पाणी वापरासाठीचे ठोक जल प्रशुल्क

१) औद्योगिक प्रयोजनार्थ निर्धारित केलेले मानक दर :

तक्ता क्र. १

| अ. क्र. | वर्गवारी | पाणीपुरवठा प्रकार व स्त्रोत | औद्योगिक पाणी वापराचे मानक दर (रू प्रति घमी) | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रक्रिया | कच्चा माल |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | आश्वासित पाणी पुरवठा | जलाशयातून पाणी वापर | ४.८० | १२०.०० |
| २ | वहनव्ययासह नियंत्रित पाणी पुरवठा | धरणाच्या खालील बाजूची नदी, कालवे व को.प.बंधा-यामध्ये धरणातून नियंत्रित पाणी सोडून होणारा पाणी वापर | ९.६० | २४०.०० |
| ३ | अंशतः आश्वासित पाणी पुरवठा | कोणत्याही जलाशय/ कालव्यातून पाणी न साडता केवळ नदीच्या नैसर्गिक प्रवाहातून पाणी वापर. | २.४० | ६०.०० |
| ४ | किमान ८ महिन्यांच्या पाणी वापराच्या क्षमते इतका बंधारा स्वखर्चाने बांधलेला व स्वखर्चाने व्यवस्थापन होत असल्यास | संस्थेच्या खाजगी जलाशयातून किंवा जलाशय निर्मितीचा प्रमाणशीर खर्च संस्थेने सोसला असल्यास अशा जलाशयातून होणारा पाणी पुरवठा | ०.७७ | १९.२० |

**टिप १** - ज्या प्रकरणी संस्थेने स्वखर्चाने धरण बांधले आहे किंवा धरणाच्या पाणी वापराच्या प्रमाणात खर्च दिला आहे तथापि जलसंपदा विभाग धरणाची देखभाल-दुरूस्ती जलसंपदा विभागाच्या निधीतून करत आहे, अशा प्रकरणी तक्ता क्र. १ अ. क्र. ४ मधील दरात २०% वाढ अनुज्ञेय राहील.

**टिप २** - पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होणारे उद्योग म्हणजे शीतपेये, आसावनी (Brewery), मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग.

M.W.R.R.A. MUMBAI

२) पाणी वापराच्या मर्यादा :

प्राधिकरणाने संदर्भ - १ मधील परिच्छेद ७ नुसार औद्योगिक प्रयोजनार्थ ठोक पाणी वापराचे निकष निश्चित केलेले आहेत. यामध्ये उद्योग निहाय पाणी वापराची मानके निर्धारित केलेली आहेत.

३) पाणी वापरानुसार पाणीपट्टी आकारणीचे दर :

काटकसरीने पाण्याच्या वापरास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने व पाण्याचा अपव्ययास आळा घालण्याच्या दृष्टीने औद्योगिक पाणी वापराचे पुढील प्रमाणे वाढीव वापरासाठी वाढीव दर (Increasing Block Tariff) निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रत्यक्ष पाणी वापर | आकारणीचा दर |
|---|---|---|
| अ | अनुज्ञेय पाणी वापराच्या ११५ % पर्यंतच्या परिमाणावर | मानक दर |
| ब | अनुज्ञेय पाणी वापराच्या ११५ % मर्यादेवरील पाणी वापरावर | मानक दराच्या १.५० पट दराने |

टीप :- ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी / निमशासकीय संस्थांनी स्वखर्चाने जलाशये निर्माण केलेली आहेत व त्याची देखभाल-दुरूस्ती सुद्धा स्वखर्चाने केली जाते अशा जलाशयातून वापरलेल्या संपूर्ण पाण्याची आकारणी मानक दरानेच करावी.

सवलती / प्रोत्साहने/ दंडनीय तरतुदी:

४) सवलतीच्या तरतुदी

४.१) कृषी उद्योगासाठी : कुक्कुटपालन, राईस मील, दुग्ध व्यवसाय, मक्यावरील प्रक्रिया, वनस्पती तुप इ. साठी ७५ % दराने आकारणी करावी. मात्र ऊस, मका इत्यादी पासून अल्कोहोल, इथेनॉल निर्मिती साठी तसेच वायनरी ब्रुवरीसाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही.

४.२) औद्योगीक पाणी वापराचा स्रोत हा कालव्याच्या जलप्रदाय क्षेत्रातील व कालव्याच्या कोणत्याही बाजूस त्याच्या निकटतम हद्दीपासून ३५ मीटरच्या आत असलेली विहिर असल्यास अशा औद्योगीक पाणी वापरासाठीचा दर हा परिशिष्ट ३, तक्ता १ अ. क्र. २ मधील दराच्या ५०% राहील.

५) प्रोत्साहनात्मक तरतुदी

५.१) संदर्भ - १ मधील निकषातील परिच्छेद ७.२ (ix) नुसार, जर एखादा उद्योग पाण्याचा पुनर्वापर करुन पाणी वापर कमी करत असल्यास (पुनर्वापराच्या सहाने नक्त पाणी मागणी किमान ७५ टक्के च्या मर्यादेपर्यंत वा त्यापेक्षा कमी करीत असेल तर) अनुज्ञेय दराच्या ७५ टक्के दराने आकारणी करावी. तथापी, याबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांचेपेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे.

M.W.R.R.A. MUMBAI

५.२) औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याचा अधिकार औद्योगिक पाणी वापरकर्त्यास असतील. मात्र प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापरासाठी प्रक्रिया केंद्रावरून बंदिस्त पाईपद्वारे (नदी नाल्यामध्ये न सोडता) उचलणे आवश्यक राहील. असे पाणी शेतीसाठी पुरविल्यास या साठीचा दर नैसर्गिक पाण्याच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दराच्या ६०% पेक्षा जास्त नसावा. तसेच अशा पाणी वापराचा तपशील जलसंपदा विभागास देणे आवश्यक राहील.

६) दंडनीय तरतुदी

६.१) विहित मानकानुसार सांडपाण्यावर प्रक्रिया न करणाऱ्या उद्योगांबाबत संदर्भ - १ मधील परिच्छेद ७.२ (vii) नुसार कार्यवाही करावी. अशा उद्योगांना आकारवयाचा वाढीव दर हा औद्योगिक प्रयोजनार्थ निर्धारित केलेल्या मानक दराच्या दुप्पट असेल. ज्या प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मऔविम) मार्फत औद्योगीक संस्थांना पाणी पुरवठा होतो व अशा औद्योगीक संस्थांपैकी काही संस्थांनी सांडपाण्यावर विहीत मानकानुसार प्रक्रिया करित नसल्यास अशा संस्थे कडून मानक दराच्या दुप्पट दराने वसुली करण्याची व रक्कम जलसंपदा विभागाकडे जमा करण्याची जबाबदारी मऔविमची राहील. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने अशा संस्थेचा पाणी पुरवठा बंद करण्याचे आदेश दिल्यास अशा संस्थेचा पाणी पुरवठा करणे मऔविम यांस बंधनकारक राहील.

६.२) मीटरशी छेडछाड करणे, मीटर चूकीचे रिडींग दाखवत असल्यास किंवा मीटर चालू नसल्यास मीटर चालू करण्यासाठी किंवा दुरूस्त करण्यासाठी १ महिन्याची मुदत द्यावी. या कालाबधीतील आकारणी लगतच्या कालावधीतील प्रत्यक्ष वापर / आरक्षण / मजनिप्राचे दि. २२ सप्टेंबर २०१७ च्या निकषातील Specific Water Consumption व उत्पादन या आधारे परिगणित होणारा पाणीवापर, यापैकी जे जादा असेल असे परिमाण विचारात घ्यावे व आकारणी दर मानक दराच्या १.२५ पट राहील. विशिष्ट स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन मीटर दुरूस्ती कालावधीस १ महिन्याची मुदत वाढ देता येईल. या मुदतवाढ कालावधीत आकारणीचा दर मानक दराच्या १.५० पट राहील. मात्र या मुदतीत ही मीटर दुरूस्त न झाल्यास पाणी पुरवठा खंडीत करावा. मऔविमच्या बाबतीत संपूर्ण पाणी पुरवठा बंद न करता पिण्याच्या पाण्याइतकाच पाणी पुरवठा मर्यादीत करावा. मीटर न बसविता पाणी वापर केल्यास अनुज्ञेय दराच्या दुप्पट दराने आकारणी करण्यात यावी.

६.३) मंजुरी असतांना मीटर बसवून तथापि करारनामा न करता मंजूर मर्यादेत पाणी वापर केल्यास २.० पट दराने आकारणी करावी.

६.४) मंजुरी शिवाय / करार न करता, व मीटर न बसवता पाणी वापर केल्यास अनुज्ञेय दराच्या २.५ पट दराने आकारणी करावी. परिमाणाची परिगणना उपरोक्त ६.२ नुसार करावी.

६.५) थकित पाणीपट्टीवर द.सा.द.शे. १०% दराने दंड आकारणी करावी.

M.W.R.R.A. MUMBAI

<u>परिशिष्ट क्र. ४</u>

## हमी शुल्क व दंडनीय आकारणी यांची अंमलबजावणी

(स्पष्टीकरणात्मक उदाहरण)

**हमी शुल्क :-**

समजा एका वापरकर्त्याने ५ वर्षांकरिता १०० दलघमी बिगर सिंचन पाणी वापरासाठी जलसंपदा विभागाशी करारनामा केला आहे. त्या वापरकर्त्यास १०० दलघमी पाणी ४ थ्या वर्षापासून लागणार आहे व पहिल्या ३ वर्षातील त्याची गरज अनुक्रमे ५०, ६० व ८० दलघमी आहे. ही टप्पानिहाय पाण्याची गरज करारनाम्यात नमूद केली जाईल.

सदर पाणी वापराची प्रशुल्क आकारणी पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | वर्ष एक | ५० X मानक दर + उर्वरित ५० वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार |
| २. | वर्ष दोन | ६० X मानक दर + उर्वरित ४० वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार |
| ३. | वर्ष तीन | ८० X मानक दर + उर्वरित २० वर अनुज्ञेय दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार |
| ४. | वर्ष चार व पाच | १०० X मानक दर |

**दंडनीय आकारणी:-**

तथापि उपरोक्त टप्पेनिहाय परिमाणानुसार प्रत्यक्ष पाणी वापर झाला नसेल व त्यात १०% पेक्षा जास्त तफावत असेल तर खाली दिल्याप्रमाणे प्रशुल्क आकारण्यात येईल.

(१) समजा पहिल्या वर्षी ५० दलघमी ऐवजी ६० दलघमी वापर झाला असेल. हा वापर + १०% या मंजूर तफावतीनुसार येणाऱ्या ५५ दलघमी पेक्षा ज्यादा आहे. त्यास प्रशुल्क आकारणी खालीलप्रमाणे होईल.

५५ दलघमी X मानक दर + ५ दलघमी X मानक दराच्या १.५ पट दर + ४० दलघमी X मानक दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार

(२) समजा दुसऱ्या वर्षी ६० दलघमी ऐवजी फक्त ५० दलघमी वापर झाला असल्यास किमान ५४ दलघमी (९०% परिमाण) पाणी वापरावर मानक दराने आकारणी करावी. प्रशुल्क आकारणी पुढीलप्रमाणे राहील.

५४ दलघमी X मानक दर + ४६ दलघमी X मानक दराच्या ५% प्रमाणे हमीशुल्क आकार.

---xxxx----

M. W. R. R. A. MUMBAI

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority

## शुद्धीपत्रक

## आदेश क्रमांक २ / २०१८

### महाराष्ट्र राज्यात घरगुती, औद्योगिक व कृषी - सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्र. १/२०१८ दि. ११ जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशामध्ये :-

१) पृष्ठ क्र. ३, परिच्छेद १.६ पहिल्या ओळीमध्ये, "सिंचनामधील होणारा अनियमित पाणीवापर व पाणीनाश नियमित करण्यासाठी जलसंपदा" या ऐवजी "सिंचनामधील होणारा अनियंत्रित पाणीवापर व पाणीनाश नियंत्रित करण्यासाठी जलसंपदा" असे वाचावे.

(वि. ज. तिवारी)
सदस्य (विधी)

(वि. मा. कुलकर्णी)
सदस्य (जसं-अभियांत्रिकी)

(के. पी. बक्षी)
अध्यक्ष

M. W. R. R. A. MUMBAI

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.
Tel.:(O)+91-22-2215 2019, Email: mwrra@mwrra.in I mwrralibrary@yahoo.co.in I Website : www.mwrra.org

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority

शुद्धीपत्रक-२/२०१८ (आदेश क्र.१/२०१८ दि.११ जानेवारी २०१८)

## महाराष्ट्र राज्यात घरगुती, औद्योगिक व कृषी - सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी ठोक जलदराचे पुनर्विलोकन व सुधारणा

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्र. १/२०१८ दि. ११ जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या आदेशामध्ये, खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे :-

१) पृष्ठ क्र. ७, परिच्छेद ३ तक्ता क्रमांक २ स्तंभ क्रमांक ४,५ व ६ चे शिर्षक मधील "प्रस्तावित दर" **याऐवजी** " पाण्याचे दर " **असे वाचावे.**

२) पृष्ठ क्र.९, परिच्छेद ५ च्या दुसऱ्या ओळीमध्ये " उपरोक्त १ (अ) नुसार " **याऐवजी** " उपरोक्त तक्ता क्र. १ नुसार " **असे वाचावे.**

३) पृष्ठ क्र.९, परिच्छेद ७.१ च्या दुसऱ्या ओळीमध्ये "अनुरुप (१अ/१क)" **याऐवजी** " अनुरुप (तक्ता १ व परिच्छेद ५) " **असे वाचावे.**

४) पृष्ठ क्र.१४, परिच्छेद ७.१ च्या पहिल्या ओळीमध्ये " परिच्छे २.२ मधील नमूद " **याऐवजी** " परिच्छेद ३ मधील तक्ता क्र. २ मध्ये नमूद " **असे वाचावे.**

५) प्राधिकरणाचा आदेश क्र. १/२०१८ दिनांक ११ जानेवारी २०१८ सोबतच्या यापूर्वी दिलेल्या " शुध्दीपत्रक आदेश क्र. २/२०१८" **याऐवजी** " शुद्धीपत्रक-१/२०१८ (आदेश क्र.१/२०१८ दि.११ जानेवारी २०१८)" असे वाचावे.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (शि.त्रि.सांगळे) | (वि. ज. तिवारी) | (वि. मा. कुलकर्णी) |
| सदस्य (अर्थव्यवस्था) | सदस्य (विधी) | सदस्य (जसं-अभियांत्रिकी) |

सही/-
(के. पी. बक्षी)
अध्यक्ष

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव

M.W.R.R.A. MUMBAI